RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १(२)] मंगळवार, फेब्रुवारी २४, २०२६/फाल्गुन ५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **२४ फेब्रुवारी २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभेत नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. II OF 2026.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २.**

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, २०२५ चा महा. अध्या. १४. म्हणून, त्यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे),याच्या कलम १४ मध्ये, पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :- १९६२ चा महा. ५.

"(२) राज्य शासन, अशा निवडणुका घेण्याकरिता नियम करील आणि अशा निवडणुका, त्या नियमांनुसार घेण्यात येतील.

(३) नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा. अध्या १४.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना, नियम किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३ट आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याच्या कलम ९अ मध्ये अशी तरतूद केली आहे की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याचे आणि निवडणुका घेण्याचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण राज्य निवडणूक आयोगाकडे निहित असेल.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम १४(२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासन, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयाकडे अपील करण्यासह अशा निवडणुका घेण्याकरिता नियम करील. त्यानुसार, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निर्वाचक गट व निवडणूक घेण्याबाबत) नियम, १९६२ याच्या नियम २० आणि महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेण्याबाबत) नियम, १९६२ याच्या नियम १९अ यांमध्ये, नामनिर्देशन पत्रे स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निवडणूक अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल करण्याबाबत आणि जिल्हा न्यायालयाने, अशा अपिलांची सुनावणी दररोज घेणे आणि शक्य असेल तितक्या शीघ्रगतीने ते निकालात काढणे आवश्यक असल्याबाबत तरतूद केलेली होती.

**३.** राज्य निवडणूक आयोगाने, राज्य शासनाला असे कळविले होते की, विविध जिल्हा न्यायालयांमध्ये वेगवेगळ्या कालावधीसाठी अशी अपिले प्रलंबित आहेत आणि अशी अपिले केव्हा निकालात काढण्यात येतील हे देखील निश्चित नाही. आयोगाने असे देखील कळविले होते की, निवडणुकीसंबंधीच्या बाबींमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास रोध असल्याची तरतूद भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४३ण मध्ये केली आहे. म्हणून, आयोगाने, कालबद्ध रीतीने निवडणुका घेण्याच्या दृष्टीने, अशा अपिलांशी संबंधित असणाऱ्या तरतुदी वगळण्याकरिता वर निर्दिष्ट केलेल्या नियमांमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविलेला होता. म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटले.

**४.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२५ (२०२५ चा महा. अध्या. १४) हा प्रख्यापित केला होता.

**५.** उक्त आध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६.

**जयकुमार गोरे,**
ग्रामविकास मंत्री.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.